# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 15/02/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध

## नागपूर ग्रामीणची कारवाई

दि. १४/०२/२०२४ चे सकाळी ०५/०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ पोलीस स्टेशन कुही हद्दित खाजगी वाहनाने पेट्रोलिंग व अवैध धंद्यावर कार्यवाही करिता पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळाली कि, एक पिवळया रंगाचा टिप्पर हा उमरेड कडुन नागपुरकडे टिप्परमध्ये रेती भरुन घेऊन जात आहे. अशा माहितीवरुन चांपा टोल नाका येथे नाकाबंदी करित असता उमरेड कडुन नागपुरच्या दिशेने एक पिवळया रंगाचा १० चक्का टिप्पर क्र. MH-49/1136 हा येतांनी दिसल्याने त्याला हात इशारे करुन थांबवुन टिप्परची पाहणी केली असता त्यामध्ये ६ ब्रास रेती किंमती ३६,०००/— रु. चा मुद्देमाल मिळुन आल्याने रेतीबाबत चालक यास परवाना (रॉयल्टी) दाखविण्यास सांगितले असता कोणताही परवाना नसल्याचे सांगितल्याने टिप्पर चालक यास त्याचे नाव गाव पत्ता विचारला असता **कार्तीक रमेश धनपोटे, वय २५ वर्ष रा. सिरसपा ता. पवनी जि. भंडारा** असे सांगितले. सदर टिप्परमधिल रेतीबाबत विचारणा केली असता सदर रेती ही टिप्पर क्र. MH-49/1136 चा मालकांच्या सांगण्यावरुन रेतीची वाहतुक करित असल्याचे सांगितले. आरोपीकडुन टिप्पर क्र. MH-49/1136 किंमती १५,००,०००/— रु. व ६ ब्रॅास रेती किंमती ३६,०००/— रु. असा एकुण १५,३६,०००/— रु चा मुद्देमाल आरोपी टिप्पर चालक याच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध पोस्टे कुही येथे कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८ (७), ४८ (८) महा. ज.म. कायदा सहकलम ४,२१ खाणी आणी खनिजे अधि. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकशान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री. राजा पवार, पोस्टे कुही येथील ठाणेदार श्री. सपोनि अमितकुमार आत्राम, पो. हवा. चांगदेव कुथे, पोलीस नायक प्रविण जावरकर, पोलीस अंमलदार अरविंद ठाकरे नेमणुक उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय उमरेड विभाग उमरेड यांनी केली.

# <u>रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध</u>

# <u>नागपूर ग्रामीणची कारवाई</u>

दि. १४/०२/२०२४ चे सकाळी ०६/०० वा दरम्यान पोलीस स्टेशन कुही हद्दित खाजगी वाहनाने पेट्रोलिंग व अवैध धंद्यावर कार्यवाही करिता पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळाली कि, एक पिवळया रंगाचा टिप्पर हा उमरेड कडुन नागपुरकडे टिप्परमध्ये रेती भरुन घेऊन जात आहेत. अशा माहितीवरुन चांपा टोल नाका येथे नाकाबंदी करित असता उमरेड कडून नागपुरच्या दिशेने १) एक पिवळया रंगाचा १० चक्का टिप्पर क्र. MH-40/BG-7450 चा चालक आरोपी नामे– **क्रिष्णा श्रिहरी बोरीकर, वय २४ वर्ष रा. खलासना ता. कुही जि. नागपुर** हा आपल्या वाहनात ६ ब्रॉस रेती कि. ३६,०००/– रु. **२)** एक पिवळया रंगाचा १० चक्का टिप्पर क्र. MH-40/BG-4836 चा चालक आरोपी नामे– **अनिकेत देवेंन्द्र श्रिरामे वय १९ वर्ष रा. ईरवा ता. चिमुर जि. चंद्रपुर** यांनी आपल्या वाहनात ६ ब्रॉस रेती किंमती ३६,०००/– रू. असे एकुण १२ ब्रास रेती किमती ७२,०००/– रू. रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून दोन्ही वाहनातील १) १२ ब्रॉस रेती किंमती ७२,०००/– रू., २) टिप्पर क्र. MH-40/BG-7450 कि. २०,००,०००/–रू. व टिप्पर क्र. MH-40/BG-4836 कि. २०,००,०००/– रु. असा एकुण

४०,७२,०००/–रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी टिप्पर चालक व मालक यांचे विरूद्ध पोस्टे कुही येथे कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७),४८(८) महा.ज.म. कायदा सहकलम ४,२१ खाणी आणी खनिजे अधि. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकशान प्रति. अधि, १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री. राजा पवार, पोस्टे कुही येथील ठाणेदार श्री. सपोनि अमितकुमार आत्राम, पो. हवा. चांगदेव कुथे, पोलीस नायक प्रविण जावरकर, पोलीस अंमलदार अरविंद ठाकरे नेमणुक उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय उमरेड विभाग उमरेड यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**